# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08/02/2024 (गुरूवार) सायंकाळ

---

### शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीतांना कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कोंढाळी :— फिर्यादी नामे— पोशि/९९४ पन्नालाल नंदलाल बटाउवाले पो.स्टे. कोंढाळी यांच्या रिपोर्ट वरुन पो. स्टे. कोंढाळी येथे अप. क्र. १५९/१८ कलम ३५३, ३३२, ३३३, ३२६, १४३, १४७, १४८, १४९, १२०(ब) भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादी व इतर स्टाफ हे पोलीस ठाणे येथे हजर असतांना माहिती मिळाली की, वर्धा रोडवरील पल्टी झालेल्या दारूच्या गाडीतील काही माल वर्धा रोडवरील सायखोड परिसरात काही व्यक्तीकडे आरोपीतांनी आणुन ठेवले आहे. सदर माहितीची शाहानिशा करणेकामी फिर्यादी हे स्टाफसह मोटरसायकलने रवाना होवुन वर्धाफाटा येथुन आरोपी क्र. १० याचे दुकानासमोर फिर्यादी यांनी आपली मोटरसायकल उभी करून मुखबीर लावुन सदर माहितीची शाहानिशा करणेकरीता फिर्यादी व स्टाफ वर्धा फाटाकडे गेले. तसेच फिर्यादी व स्टाफ हे सायखोड मध्ये जाणा—या गल्लीत माहिती घेत असता तेथे नमुद **आरोपी नामे— १) शेख शरीफ शेख अजीज वय ४४ वर्ष, रा. कोंढाळी २) सरफराज शेख जब्बार शेख २२ वर्ष, रा. कोंढाळी ३) शेख इकबाल शेख सत्तार वय ३३ वर्ष, रा. कोंढाळी ४) शेख जाहिद शेख समदानी वय ३१ वर्ष रा. कोंढाळी ५) मोहम्मद साईद शेख अजीज वय ३१ वर्ष रा. कोंढाळी ६) शेख रशीद शेख अजीज वय ६६ वर्ष रा. कोंढाळी ७) शेख मुक्तार शेख सत्तार वय ३९ वर्ष रा. कोंढाळी ८) सलमान शेख नफार शेख वय २० वर्ष रा. कोंढाळी ९) सुरज उर्फ भोदु राउत रमेश राउत वय २२ वर्ष रा. कोंढाळी १०) शेख गफार शेख भुरू वय ५० वर्ष रा. ५० वर्ष रा. कोंढाळी** हे अचानक हातात लाठ्या व दगड घेवुन पोलीसांकडे येवुन त्यांना घेरले व आरोपी क्र. १० याने जोराने ओरडुन ''ये पोलीसवाले हमारे मोहल्ले मे पुचताछ के लिये कैसे आये । ईन्होने सब धंदे बंद कर दिए मेरे पे जुओ की रेड कर क्लब कल बंद कर दिया। अभी अपने मोहल्ले मे दारू के बारे मे पुचताछ कर रहे है । ईन्हे ऐसा सबक सिखाओ कि, दुबारा ये अपने पे कारवाई करने की हिंमत ना कर पाए । असे म्हणुन मारो सालो को खतम कर दो'' असे म्हणुन आरोपीतांनी लाठ्या व काठ्यांनी तसेच दगडांनी मारहान करून जिवाने मारण्याच्या उद्देशाने गंभीर जखमी केले व शासकिय कर्मचाऱ्यावर हमला करून शासकिय कामात अडथळा निर्माण केला.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि. पुरूषोत्तम अहीरकर यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. डी. जे. १० भोसले सो. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनांक ०८/०२/२०२४ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे. १० भोसले सो. यांनी वरील नमुद आरोपीतांना सदर गुन्हयात १) कलम १४३, १४९ भादंवि. मध्ये ३ महिने सश्रम कारावास २) कलम १४७, १४९ भादवि. मध्ये १ वर्ष सश्रम कारावास व १०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास ३) कलम १४८, १४९ भादवि. मध्ये १ वर्ष व ६ महिने सश्रम कारावास व १०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास ४) कलम ३५३, १४९ भादवि. मध्ये २ वर्ष ६ महिने सश्रम कारावास व ३०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास ५) कलम ३२३, १४९ भादवि. मध्ये ६ महिने सश्रम कारावास व ५००/— रू. दंड, दंड न भरल्यास १ महिना सश्रम कारावास ६) कलम ३३२, १४९ भादवि. मध्ये १

वर्ष ६ महिने सश्रम कारावास व १०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी शेंद्रे सा॓ यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन नापोशि पवन येवतकर पो.स्टे. कोंढाळी यांनी मदत केली आहे.

## चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०२ किमी अंतरावर चिंचे हॉस्पीटल काटोल येथे दिनांक ०६/०२/२०२४ चे ०८.०० वा. ते दि. ०७/०२/२०२४ चे ०५.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्रमोद मोतीबाबा घाडगे, वय ५६ वर्ष, रा. नबिरा ले आउट काटोल जि. नागपूर हे नगर परिषद काटोल येथे ठेकेदारीचे काम करतात. त्याचेकडे ०२ ट्रॅक्टर व ६ टिप्पर असुन ते ठेकेदारीचे कामाकरीता वापरतात. ट्रॅक्टर चालविण्यासाठी सुरज धुर्वे व श्रावण कुंभरे दोन्ही रा. पेठबुधवार हेटी काटोल यांना ठेवले आहे. दि. ०६/०२/२०२४ चे रात्री ०८/०० वा. ते दि ०७/०२/२०२४ चे ०५/०० वा. सुमारास चिंचे हॉस्पिटल काटोल येथे ठेवलेल्या दोन ट्रॅक्टर मधिल ०२ बॅटरी तसेच विपिन राठी, अंकुर राठी व कुलदीप चांडक याच्या टिप्प्रच्या ०४ बॅटरी तसेच धवड पेट्रोलपंप काटोल जवळ लाला रूडा भरवार याचे टिप्परच्या जुन्या ०६ बॅटऱ्या एकुण १२ बॅटऱ्या किंमती ५६,०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी सहायक फौजदार रूडे यांनी भेट दिली असुन आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार रूडे, मो. नं. ९९२३३५२६४६ हे करीत आहे.

## फसवणुक

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत १५ किमी अंतरावर मौजा एस एस फुड महालगाव येथे दिनांक ०१/०४/२०२२ चे १०.०० वा. ते दि. ०१/०६/२०२२ चे १०.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— डालचंद चतुरभूज पालीवाल, वय ५४ वर्ष, रा. एस एस फुड महालगाव यांचे वडीलोपार्जित एस एस फुडस प्रोडक्ट्स प्रायव्हेट लिमिटेड नावाने गव्हापासून सुजी रवा बनविण्याचा कारखाना असून ओपन मार्केटमधून गहू खरेदी करून त्यापासून महालगाव कारखाना येथे तयार झालेला सुजी रवा मैदा पुर्ण भारतात सप्लाय करत असतो. सन २०२२ मध्ये माकम श्रीनिवास सुजान त्याचे दलाल श्री. सिदधीविनायक एजन्सी चेन्नई यांचे मार्फतीने कंपनीमध्ये फोन करून मैदयाची आर्डर असल्याचे सांगितले यावरून **आरोपी नामे— १) माकम श्रीनिवास सुजान, वय ३५ वर्ष, २) माकम श्रीनिवास सुरज वय ३९ वर्ष ३) माकम श्रीनिवास सावै, वय ४४ वर्ष, रा. सर्व ४४/२ श्राीनिवास फलोर मिल बिल्डीगं मागडी रोड मेट्रो स्टेशन जवळ बेंगळूरू** यांच्या ऑर्डरवरून मैदा पुरविल्यानंतर दोन महिन्याचे आत पेमेंट दयायचे ठरविले होते. कंपनीकडुन सन २०२२ मध्ये एप्रिल ते जून महिन्यात १) मेसर्स पोर्णिमा इंटरप्रायजेस विजयनगर बंगलोर येथे ०५ ट्रकमध्ये एकुण २४७० कट्टे मैदा किंमती ३४,४८,०००/— रूपयाचा मुद्देमाल पाठविला होता. त्यामधून १४,२१,२५०/— रूपये पाठविले आहे. अजूनही २०,२६,७५०/— रूपये बाकी आहे. तसेच २) श्री. मेसर्स शुमेरो इंटरप्रायजेस विजयनगर बंगलोर येथे ०३ ट्रकमध्ये एकुण १५०० कट्टे मैदा किंमती २१,००,०००/— रूपयाचा माल पाठविला त्यामधून ६,५०,०००/— रूपये पाठविण्यात आले आहे. उर्वरीत १४,५०,०००/— रूपये मिळणे बाकी आहे. दोन्ही कंपनीचे मालकांनी अजूनपर्यंत पैसे पाठविले नाही. जिएसटी सर्टीफिकेट नुसार तपासणी केली असता नमुद फर्मचे मालक दुसरे कोणी असल्याचे दिसून आलेले आहे. परंतु आरोपी तिनही माकम श्रीनिवास सुजान, माकम श्रीनिवास सुरज, माकम श्रीनिवास सावै यांनी

फसवणूक करून पुर्ण माल खाली करून स्वत:चे पत्त्यावर श्री. सिदधीविनायक एजन्सी चेन्नई यांचे मार्फतीने माल उतरवून घेतला आहे. किंमती ५५,४८,०००/— रूपयाचा मुद्देमाल असून त्यापैकी २०,७१,२५०/—रू. पैसे पाठविले आहे. परंतु उर्वरीत ३४,७६,७५०/— रूपये पाठविले नाही. फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम ४२०, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस निरीक्षक राजपूत यांनी भेट दिली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक राजपूत, मो. नं. ८०८७०३१२६१ हे करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील मॅग्नीज प्रोडक्ट कॉरपोरेशन नयाकुंड ता. पारशिवनी येथे दिनांक ०६/०२/२०२४ चे १४.३० वा. ते दि. ०७/०२/२०२४ चे ०८.०० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने बंद वर्कशॉपचे लोखंडी शटरचा ताला तोडुन आतमध्ये प्रवेश करून तेथे ठेवलेला लोखंडी रोल वजन अंदाजे २०० किलो किंमती २०,०००/— रू चा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— फरीद कमरूद्दीन शेख, वय ३९ वर्ष, रा. शिवनगर तारसा रोड कन्हान यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पो.नि. सोनवणे पो.स्टे. पारशिवनी यांनी भेट दिली असुन आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक विशाल इंगोले, मो. नं. ९२८४५४२१५३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**